तरुण भारत
Pune Paper | 2026-08-23 | Page- 5
epaper.tarunbharat.net

# १४ शाळांत सायबर सुरक्षा जनजागृती अभियान



**पुणे, २२ ऑगस्ट**

डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पृष्ठभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या जनजागृती अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पुणे शहरातील १४ शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला असून, २८०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

क्विक हील फाऊंडेशनच्या 'सायबर शिक्षा, सायबर सुरक्षेसाठी' या अभियानांतर्गत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना फिशिंग, बनावट वेबसाइट व लिंक, ओटीपी आणि यूपीआय फसवणूक, क्यूआर कोड स्कॅम, बनावट कॉल, सावध राहण्याबाबत माहिती देण्यात आली. सायबर वॉरियर्स स्वाती बरदापुरे आणि अनुभा साठे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून सायबर फसवणूक टाळण्याबाबत माहिती घेतली. ओटीपी , पासवर्ड व वैयक्तिक माहिती कोणाशीही शेअर करू नये, असा संदेश देण्यात आला.महार्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या के. बी. जोशी इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी अभियानात सक्रिय सहभाग घेतला. प्राचार्या डॉ. अनघा वैद्य व प्रा. मनाली सपकाळ यांचे सहकार्य लाभले.